क्रमांक : १७५८८/ ग-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : 18 NOV 2021

:: परिपत्रक ::

महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी हिवाळी अधिवेशन मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२१ पासून विधान भवन, नागपूर येथे सुरू होणार आहे.

नागपूर येथे अधिवेशनाच्या कामासाठी या सचिवालयातील गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांची निवास व्यवस्था नेहमीप्रमाणे नवीन इमारत व १६०/२ खोल्यांचे गाळे येथे करण्यात येईल. पुरेशा जागेअभावी **एका खोलीत गट-अ मधील ४ अधिकारी, गट-ब, गट-क व गट-ड मधील ५ अधिकारी/कर्मचारी असतील.** त्याअनुषंगाने उपरोक्त गटातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, एका खोलीत गटाने राहू इच्छिणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी वर नमूद केलेल्या संख्येनुसार आपल्या **गटातील नावे एकत्रित स्वरूपात स्वाक्षरीसह पृष्ठ २ वरील नमुन्यात "बुधवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत"** ग-१' कक्षाकडे कळवावीत. तथापि, त्यांची विशिष्ट गटामध्ये राहण्याची व्यवस्था होईलच याची हमी देता येणार नाही. एखाद्या खोलीमध्ये त्यांच्या पसंतीनुसार गट पूर्ण होत नसल्यास त्या खोलीतील रिक्त जागी दुसरा कोणताही अधिकारी/कर्मचारी देण्यात येईल. तसेच, अधिवेशन कालावधीत नागपूर येथील वास्तव्यात जे अधिकारी/कर्मचारी नातेवाईकांकडे राहू इच्छितात त्यांनी आपले नावे कळवू नये. ज्या खोलीमध्ये ज्या कर्मचाऱ्यांची नावे कार्यालयाने दाखविलेली आहे त्यांनी त्याच ठिकाणी राहणे आवश्यक आहे. **एखादा कर्मचारी नागपूर येथे अधिवेशनाच्या कामाकरीता येणार नसतानाही त्याने खोलीसाठी नाव दिल्यास अथवा खोलीचे वाटप करण्यात आल्यानंतर संबंधित कर्मचारी तेथे राहत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

मा.पीठासीन अधिकारी व मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांच्या आस्थापनेवरील सर्व कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय मा.पीठासीन अधिकारी व मा.विरोधी पक्षनेते यांच्या निवासस्थानाजवळील रविभवन येथे स्वीय सहाय्यकांसाठी असलेल्या निवासस्थानांमध्ये करण्यात येईल.

( राजेश तारवी )
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

(१) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी.
(२) मा.सभापती व मा.अध्यक्ष यांचे सचिव.
(३) मा.उप सभापती, मा.उपाध्यक्ष, मा.विरोधी पक्षनेते विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(४) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक.
(६) सर्व समिती प्रमुखांचे स्वीय सहाय्यक.
(७) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.



D:\data\g१ backup\NAGPUR SESSION २०२१\starting\paripatrak.doc

दिनांक : नोव्हेंबर, २०२१

# तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

## नागपूर येथील १६०/२ खोल्यांचे गाळे तसेच नवीन इमारत येथील कक्ष वाटपासंदर्भात भरून द्यावयाचे विवरण

बॅरेक क्रमांक :

ब्लॉक क्रमांक :

| अ.क्र. | अधिकारी /कर्मचाऱ्याचे नाव | पद | कक्ष | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| (१) | श्री./श्रीमती | | | |
| (२) | श्री./श्रीमती | | | |
| (३) | श्री./श्रीमती | | | |
| (४) | श्री./श्रीमती | | | |
| (५) | श्री./श्रीमती | | | |